**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः02.12.2024** **वारःसोमवार**

---

1. सायबर गुन्हे आणि कृत्रिम बुद्धीमत्तेमुळे निर्माण झालेल्या आव्हानांकडे पोलिस यंत्रणांनी संधी म्हणून पाहावं-पंतप्रधानांचं आवाहन
2. राज्याच्या मुख्यमंत्रीपदाबाबत भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांचा निर्णय मान्य असेल-काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा पुनरुच्चार
3. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या विधानसभा गटनेतेपदी जितेंद्र आव्हाड, तर मुख्य प्रतोदपदी रोहित पाटील यांची निवड आणि
4. अडतिसाव्या पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेवर यंदाही इथिओपियाच्या धावपटूंचं वर्चस्व

**पोलिस-परिषद**

सायबर गुन्हे, डिजिटल माध्यमातून होणारी फसवणूक आणि कृत्रिम बुद्धीमत्तेमुळे निर्माण झालेल्या आव्हानांकडे पोलिस यंत्रणांनी संधी म्हणून पाहावं असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ओडिशा मधल्या भुवनेश्वर इथं आयोजित अखिल भारतीय पोलिस महासंचालक आणि पोलीस महानिरीक्षकांच्या परिषदेच्या समारोपाच्या दिवशी काल पंतप्रधानांनी अधिकाऱ्यांशी सुरक्षेशी संबंधित महत्वाच्या मुद्द्यांवर चर्चा केली. सायबर सुरक्षा, किनारी सुरक्षा आणि माओवाद्यांच्या कारवाया आदी विषयांचा यात समावेश होता. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, केंद्रीय गृहसचिव गोविंद मोहन, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल आदी यावेळी उपस्थित होते. नव्या तंत्रज्ञानामुळे निर्माण झालेली आव्हानं, कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन तसंच अंमली पदार्थ, दहशतवादविरोधी रणनीती आदी विषयांसह सुरक्षिततेला धोका ठरणाऱ्या समस्यांचा सामना करण्यासाठी धोरणात्मक मार्ग निश्चित करणे हा या परिषदेचा उद्देश होता.

**शिंदे-सातारा**

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाबाबत भाजपाचे वरिष्ठ नेते जो निर्णय घेतील तो आपल्याला मान्य असेल असा पुनरुच्चार काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल केला. दोन दिवसांपूर्वी मुख्यमंत्री सातारा जिल्ह्यातील दरे या आपल्या मूळ गावी आले होते. तिथून मुंबईकडे परतण्यापूर्वी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना ते म्हणाले....

**शरदपवार-बैठक**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नवनिर्वाचित आमदारांची बैठक काल मुंबईत पार पडली. पक्षाच्या गटनेतेपदी आमदार जितेंद्र आव्हाड, मुख्य प्रतोदपदी आमदार रोहित पाटील तर प्रतोद म्हणून आमदार उत्तम जानकर यांची निवड या बैठकीत करण्यात आली. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी या बाबतची माहिती पत्रकारांशी बोलताना दिली. विधीमंडळ पक्षाच्या नेत्याची निवड मात्र अद्याप करण्यात आली नसल्याचं पाटील यांनी सांगितलं.

**ईव्हीएम-छेडछाड**

राज्यात नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत ईव्हीएम मध्ये छेडछाड झाल्याचा दावा करणाऱ्या एका अज्ञात व्यक्तीविरुद्ध राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीनंतर मुंबई सायबर पोलिसांनी शनिवारी प्राथमिक माहिती अहवाल दाखल केला. ईव्हीएम मध्ये कोणत्याही प्रकारे छेडछाड करता येत नाही आणि ते वाय-फाय किंवा ब्लूटूथसह कोणत्याही नेटवर्कशी कनेक्ट केलं जाऊ शकत नाही, याचा अधिकाऱ्यांनी पुनरुच्चार केला.

**निवडणूक-फेरमतदान-सोलापूर**

सोलापूर जिल्ह्यातल्या माळशिरस विधानसभा मतदार संघात हव्या असलेल्या उमेदवाराला अपेक्षित मतं नं मिळाल्यामुळे मारकडवाडी इथल्या ग्रामस्थांनी फेरमतदान घेण्याची मागणी केली होती. मात्र यासाठी राबविण्यात आलेली प्रक्रिया निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार राबविण्यात आली आहे. तसंच या ठिकाणी वापरण्यात आलेले ईव्हिएम मशीन, व्हीव्हीपॅट आणि कंट्रोल युनिटची खात्री पक्षाच्या प्रतिनिधींकडून करण्यात आलेली आहे. त्यामुळे फेरमतदान न घेण्याचा स्पष्ट खुलासा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी केला आहे.

**नड्डा-एड्स**

एचआयव्ही एड्सबाधित व्यक्तींबद्दल संवेदनशीलता दाखवावी तसंच संक्रमित व्यक्तींच्या मानवी हक्कांचं रक्षण करावं असं आवाहन केंद्रीय आरोग्य मंत्री, जगत प्रकाश नड्डा यांनी केलं आहे. जागतिक एड्स दिनानिमित्त इंदूरमध्ये आयोजित कार्यक्रमात ते काल बोलत होते. संक्रमित व्यक्तींशी केला जाणारा भेदभाव थांबवण्यासाठी केंद्र सरकारनं एचआयव्ही संदर्भातील कायदा लागू केला आहे; तसंच तपासणी आणि उपचारांबाबत योग्य धोरण राबवल्याने आता एड्सबंधितांची संख्या कमी झाली आहे. एड्समुळे होणाऱ्या मृत्युंमध्येही घट झाली आहे, असं नड्डा म्हणाले.

**एड्स-जळगाव**

जागतिक एड्स दिनानिमित्त काल राज्यातही ठीकठिकाणी जनजागृतीपर उपक्रम झाले. मुंबई जिल्हा एड्स नियंत्रण संस्थेनं एचआयव्हीग्रस्त विद्यार्थ्यांसाठी आनंद मेळ्याचं आयोजन केलं होतं. जळगावमध्ये प्रबोधनपर फेरी आणि पथनाट्याचं आयोजन करण्यात आलं होतं.

**आसाम-नागालँड-स्थापना दिवस**

नागालँड आणि आसाम या राज्यांनी स्थापनेपासून शिक्षण, आरोग्य, रोजगार निर्मिती आणि पर्यटन क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केल्याचे गौरवोद्गार राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी काल मुंबईत काढले. नागालँड राज्याचा 1 डिसेंबर रोजी आणि आसाम राज्याचा 2 डिसेंबर रोजी असणारा स्थापना दिवस काल संयुक्तरीत्या साजरा करण्यात आला, त्यावेळी राज्यपाल बोलत होते. या दोन्ही राज्यांना निसर्ग संपदेचे वरदान लाभलं आहे. इतर राज्यातल्या नागरिकांनी या राज्यांना प्रत्यक्ष भेट देऊन तिथली संस्कृती समजावून घ्यावी, असं आवाहन त्यांनी केलं.

**पुणे पुस्तक**

वाचन संस्कृतीला चालना देण्याबरोबरच जगभरात पुण्याची नवी ओळख करण्याच्या उद्देशाने यंदाही राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीने येत्या 14 ते 22 डिसेंबर या कालावधीत पुणे पुस्तक महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. गेल्या वर्षीप्रमाणे यंदाही या महोत्सवाच्या अनुषंगानं काही उपक्रम राबवले जाणार आहेत; ऐकूया त्याबाबतचा हा वृत्तांत….

**फर्ग्युसन महाविद्यालयाच्या प्रांगणात येत्या 14 तारखेपासून पुणे पुस्तक महोत्सव सुरू होत आहे. या महोत्सवाच्या आधी म्हणजे 11 तारखेला, 'शांतता, पुणेकर वाचत आहेत' या अनोख्या उपक्रमाचं आयोजन करण्यात आलं असल्याचं पुणे पुस्तक महोत्सवाचे मुख्य संयोजक आणि न्यासाचे विश्वस्त राजेश पांडे यांनी काल सांगितलं. 11 डिसेंबरला दुपारी 12 ते 1 या वेळेत शहरातील प्रत्येक नागरिकाने आपल्या आजूबाजूला उपलब्ध असलेलं पुस्तक वाचावं आणि इतरांनाही वाचनासाठी प्रेरणा द्यावी, हा एक तास संपूर्ण पुणे पुस्तक वाचन करेल. पुणे महापालिका, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, सर्व खासगी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, महाविद्यालये, शाळा, उद्योग क्षेत्र, राजकीय पक्ष, संघटना, गणेशोत्सव मंडळे, स्वयंसेवी संस्था, ग्रंथालये, उद्याने, मोठे चौक अशा सर्व सार्वत्रिक ठिकाणी हा उपक्रम होईल, असं पांडे यांनी सांगितलं. प्रत्येक पुस्तक प्रेमींनी आपलं नाव, आपण कोणतं पुस्तक वाचत आहोत, याबाबतची माहितीही द्यावी, यंदा ही संख्या लाखाच्या पुढे जाईल असा विश्वासही पांडे यांनी व्यक्त केला आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी शिवराज सणस यांच्यासह मेघना देशपांडे पुणे.**

**भागवत-नागपूर**

जातीपातींना शास्त्रात स्थान नाही, तरीही जातीभेद सुरूच आहेत, अशी खंत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी व्यक्त केली. ते काल नागपूर इथं एका कार्यक्रमात बोलत होते. आपली संस्कृती एका भाषेपुरती आणि जातीपुरती मर्यादित नाही, ती सर्वांची आहे, मात्र गेल्या दीडशे वर्षात संकुचित वृत्ती वाढत आहे, असं भागवत म्हणाले. फक्त आपल्यापुरतं पाहायची वृत्ती योग्य नाही, असंही त्यांनी यावेळी नमूद केलं.

**जंतनाशक-मोहीम**

राष्ट्रीय जंतनाशक मोहीमेअंतर्गत राज्यात बुधवारी 4 डिसेंबर रोजी अंगणवाडी, शासकीय विद्यालयं, खासगी शाळा आणि महाविद्यालयामध्ये मुलांना जंत नाशक गोळ्या दिल्या जाणार आहेत. या मोहिमेमध्ये 1 ते 19 वयोगटातल्या आपल्या पाल्याला जंतनाशक गोळी दिल्याची नागरिकांनी खात्री करावी. या औषधामुळे सौम्य स्वरूपात मळमळणे, डोकेदुखी, उलटी यांसारखी लक्षणे दिसू शकतात. अशावेळी घाबरून न जाता बालकांना क्षार संजीवनी देणे, विश्रांती घेणे आदी उपाययोजना कराव्या किंवा नजीकच्या आरोग्य केंद्रात घेऊन जावं असं आवाहन पुणे जिल्हा आरोग्य विभागाकडून करण्यात आलं आहे.

**मॅरेथॉन**

अडतिसाव्या पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेवर या वर्षीही इथिओपियाच्या धावपटूंनी आपलं वर्चस्व कायम राखलं. काल पहाटे तीन वाजल्यापासून ही स्पर्धा सुरू झाली. पूर्ण मॅरेथॉनमध्ये पुरुष गटात असेफा आयेलंच विजेता ठरला. तर भारतीय गटात उत्तर प्रदेशाचा ग्यानबाबू अव्वल आला. नाशिकचे कमलाकर देशमुख दुसऱ्या आणि गणेश बागुल तिसऱ्या स्थानावर राहिले. पुरुषांच्या अर्ध मॅरेथॉन स्पर्धेत भारताचा हरीश विजेता ठरला. महिलांच्या पूर्ण मॅरेथॉन स्पर्धेत इथिओपियाची निगाटू बसाझिन प्रथम आली. भारतीय गटात महाराष्ट्राची अश्विनी जाधव विजेती ठरली तर महाराष्ट्रातील राष्ट्रीय खेळाडू ज्योती गवते हिला उपविजेतेपदावर समाधान मानावं लागलं. महिलांच्या अर्ध मॅरेथॉन स्पर्धेत भारताची साक्षी जड्याल विजेती ठरली. अभिनंदन सूर्यवंशी आणि रिया धोत्रे यांनी दहा किलोमीटर गटात, सौरभ मेहरा आणि मानसी यादव यांनी पाच किलोमीटर प्रकारात तर व्हीलचेअर गटात सोमनाथ जाधव आणि भाग्यश्री माझीरे विजेते ठरले. स्पर्धेतील विजेत्यांना महापालिकेकडून 35 लाख रुपयांची पारितोषिकं देण्यात आली.

**हवामान**

दक्षिण कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. अन्यत्र हवामान ढगाळ राहील.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.